| | |
|---|---|
| MHRG040029942023 | एच.एम.पी. क्रमांक — ५८३/२०२३<br>अभिजीत पवार<br>वि.<br>मोनिका पवार |

## <u>निशानी २९ खाली आदेश</u>

**०१.** प्रस्तुत अर्ज अर्जदारांनी मूळ दाव्याचे हिंदु विवाह कायदा कलम १३ब मध्ये रूपांतर करण्याकरिता दाखल केला आहे.

**०२.** अर्जदार व सामनेवाली दोघेही न्यायालयात हजर आहेत व दाव्याचे आपसी संमतीने घटस्फोटाच्या दाव्यामध्ये रूपांतर करण्यास त्यांची कोणतीही हरकत नाही.

**०३.** अर्ज तसेच मूळ दाव्याचे अवलोकन केले. मूळ दावा अर्जदार याने घ ाटस्फोट मिळणेकरिता हिंदु विवाह अधिनियम कलम १३ (१) प्रमाणे दाखल केला आहे. अर्जदार व सामनेवाली यांच्यामध्ये आपसात तडजोड झालेली आहे व त्यांनी संमतीने घटस्फोट घेण्याचे ठरविला आहे. अर्जदार व सामनेवाली यांच्यामध्ये पुन्हा एकत्र येण्याची कोणतीही आशा दिसून येत नाही, त्यामुळे मूळ दाव्याचे रूपांतर संमतीने घटस्फोट घेण्याचे अर्जामध्ये करण्याची परवानगी देणे आवश्यक आहे. त्यामुळे खालील प्रमाणे आदेश पारित करित आहे.

## <u>आदेश</u>

**१.** अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

**२.** अर्जदार यांनी दाखल केलेला घटस्फोटाचा दावा हिंदु विवाह कायदा कलम १३ब अन्वये संमतीने घटस्फोट घेण्याच्या अर्जात रूपांतरीत करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

RAJESH YASHWANTRAO KHANDARE

Digitally signed by RAJESH YASHWANTRAO KHANDARE
Date: 2026.07.22 16:13:05 +0530

**पनवेल**
**दिनांक: २२/०७/२०२६**

**( आर. वाय. खंडारे)**
**५वे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, पनवेल.**